क्रमांक : ९०७२/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ०५/२०२२

**विषय :** वयाची ५०/५५ वर्षे पूर्ण झालेल्या या सचिवालयातील कर्मचाऱ्यांची सेवेत राहण्याची पात्रापात्रता आजमाविण्यसाठी समिती गठीत करणेबाबत.

**संदर्भ :** सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. एलपीएल-२०१७/प्र.क्र.२१/का.पंधरा, दि. १० जून, २०१९

**:: कार्यालयीन आदेश ::**

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयाच्या अनुषंगाने, या सचिवालयातील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड कर्मचारी यांच्याबाबतीत वयाची ५०/५५ वर्षे पूर्ण झालेली आहेत अशा अधिकाऱ्यांची सेवेत राहण्याची पात्रापात्रता आजमाविण्यासाठी खालीलप्रमाणे विभागीय पुनर्विलोकन समिती गठीत करण्यात येत आहे.

१. अध्यक्ष – उप सचिव (आस्थापना)

२. सदस्य – उप सचिव (श्री.तारवी)

३. सदस्य – अवर सचिव (समिती) (श्रीमती सीमा तांबे)

४. सदस्य सचिव – अवर सचिव (आस्थापना)

उपरोक्त समिती या सचिवालयातील कर्मचाऱ्यांच्या वयाच्या ५०/५५ वर्षीच्या पुनर्विलोकनाबाबत शिफारस करील. पुनर्विलोकन समितीच्या शिफारशीनुसार जे कर्मचारी शासन सेवेत ठेवण्यास पात्र ठरतील, अशा गट-ब (अराजपत्रित), आणि गट-क कर्मचाऱ्यांच्या बाबतच्या शिफारशी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचा समावेश असलेल्या मा.मंडळाकडे सादर करण्यात येतील तसेच गट-ड कर्मचाऱ्यांबाबतच्या शिफारशी मा.प्रधान सचिव यांच्याकडे सादर करण्यात येतील.

मान्यतेसाठी सादर.

आदेशानुसार,

(स्वाक्षरी)

**( मोहन काकड )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

उपरोक्त नमूद सर्व अधिकारी

**प्रतिलिपी :-**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव

२) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

३) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

४) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

५) वैयक्तिक नस्ती.

६) निवडसूची.